بِسۡمِ اللّٰہِ الرَّحۡمٰنِ الرَّحِیۡمِ نَحۡمَدُہٗ وَ نُصَلِّیۡ عَلٰی رَسُوۡلِہِ الۡکَرِیۡمِ وَعَلٰی عَبۡدِہِ الۡمَسِیۡحِ الۡمَوۡعُوۡد

لَآ اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ مُحَمَّدٌ رَّسُوۡلُ اللّٰہِ

دفتر مجلس انصار اللہ بھارت

Office Of The Majlis Ansarullah Bharat

Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA

Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in

محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع: گورداسپور (پنجاب)


# उहूद युद्धात सोबतींचे अलौकिक बलीदान आणि पवित्र पैगंबरसाठी असलेल्या प्रेमाचे श्रद्धावर्धक वर्णन

सारांश प्रवचन हजरत मिर्जा मसरुर अहमद मसीहाचे पंचम खलीफा दि. ९-२-२०२४ स्थान मशिद मुबारक, टिलफर्ड, लंदन

أَشۡهَدُ أَنۡ لَا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحۡدَهٗ لَا شَرِيۡكَ لَهٗ وَأَشۡهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبۡدُهٗ وَرَسُوۡلُهٗ

اَمَّا بَعۡدُ فَاَعُوۡذُ بِاللّٰہِ مِنَ الشَّیۡطٰنِ الرَّجِیۡمِ۔ بِسۡمِ اللّٰہِ الرَّحۡمٰنِ الرَّحِیۡمِ۔

اَلۡحَمۡدُ لِلّٰہِ رَبِّ الۡعٰلَمِیۡنَ۔ الرَّحۡمٰنِ الرَّحِیۡمِ۔ مٰلِکِ یَوۡمِ الدِّیۡنِ۔ اِیَّاکَ نَعۡبُدُ وَ اِیَّاکَ نَسۡتَعِیۡنُ۔ اِہۡدِنَا الصِّرَاطَ الۡمُسۡتَقِیۡمَ۔

صِرَاطَ الَّذِیۡنَ اَنۡعَمۡتَ عَلَیۡہِمۡ ۬ۙ غَیۡرِ الۡمَغۡضُوۡبِ عَلَیۡہِمۡ وَ لَا الضَّآلِّیۡنَ۔

तशह्हुद, तआवुज आणि सुरह फातिहा पठन केल्यानंतर हुजूर अनवर म्हणाले: उहुदच्या युद्धाविषयी अबू सुफियानच्या घोषणाचा उल्लेख होत होता, ज्यामध्ये एकीकडे तो त्याच्या मूर्तींची महानता वर्णन करात होता आणि पवित्र प्रेषित (स.) हे परमेश्वराची स्तूती होते, आदर व्यक्त होते. हजरत मुस्लेह माउद (र.ज.) म्हणतात की, हदीसमध्ये उल्लेख आहे की उहूदच्या युद्धात अबू सुफयानने मोठ्याने म्हटले की आमच्या समर्थनात उज्जा मूर्ती आहे, परंतु तुमच्या समर्थनात एकही मूर्ती नाही. तेव्हा पवित्र पैगंबर मुसलमानांना संबोधून म्हणाले, तुम्हीही बोला की,

لَنَا مَوۡلَا وَلَا مَوۡلٰی لَکُمۡ ''आमच्यासाठी आमचा स्वामी आणि सहाय्यक अनंत आणि आजीवन परमेश्वर आहे परंतु तुमचा निरक्षक आणि सहाय्यक नाही.''

हजरत मुस्लेह माऊद सांगतात की, या सत्याचा काय व्यावहारिक पुरावा होता की त्यांनी तलवारीच्या सावलीतही तेच सांगितले की अल्लाह आम्हाला वाचवू शकतो.

परत हजरत मुस्लेह माऊद सांगतात की, जेव्हा मुस्लिमांच्या कानावर ही खबर आली की पवित्र पैगंबर शहीद झाले तेव्हा त्यांनी घाईघाईने परत येऊन पवित्र पैगंबरांच्यावरून मृतदेह उचलले आणि ते जिवंत असल्याचे आढळले. त्यावेळी एका सोबीतीने त्यांच्या दाताच्या सहाय्याने पवित्र पैगंबराच्या शरीरात घुसलेल्या खिळा काढले, ज्यामध्ये त्या सोबतींचे दोन दात तुटले. ते साथीदारांचा एक गट घेऊन टेकडीच्या पायथ्याशी गेले.

यावेळी अबू सुफयानने मोठ्याने पैगंबरांचे नाव ओरडला, नंतर हजरत अबू बकर आणि नंतर हजरत उमर यांचे, आणि म्हणाला की आम्ही त्यांना मारले आहे, जेव्हा अबू सुफयानने पाहिले की कोणताही प्रतिसाद मिळत नाही, तेव्हा त्याने घोषणाबाजी सुरू केली की, हुबुलचा गौरव असो, हुबुलचा गौरव असो, पवित्र पैगंबर यांनी नाव ओरड असताना प्रतिसाद न देण्याचा आदेश सोबत्याना दिले होते मात्र जेव्हा त्यांच्या कानांपर्यंत हुबुलच्या गुणगाणाचे शब्द पोहोचले तेव्हा एकेश्वरवादाची

उत्कटता उत्तेजित झाली आणि ते अल्लाहची अस्मिता लक्षात घेत जोराने म्हणालेः तुम्ही याचे उत्तर का देत नाहीत? सहाबा म्हणालेः आम्ही याचे काय उत्तर देऊ ? पवित्र पैगंबर म्हणालेः बोला! सर्वशक्तिमान अल्लाह श्रेष्ठ आणि महानतम् आहे. अल्लाह समक्ष हुबुल काय आहे. एकेश्वरवादाच्या आत्म्याचे हे एक अद्भुत प्रदर्शन आहे. तीन वेळा त्याने साथीदारांना उत्तर देण्यापासून रोखले, जे दर्शविते की त्याना संकट स्थितीची पूर्णपणे जाणयीव होती. त्याना माहित होते की इस्लामिक सैन्य विखुरले आहे आणि फारच कमी लोक त्यांच्यासोबत आहेत, बहुतेक साथीदार जखमी झाले आहेत आणि बाकीचे थकले आहेत. जर शत्रूला कळले की इस्लामी सैन्याचा काही भाग जमा झाला आहे, तर त्याने पुन्हा हल्ला करण्याचे धाडस करू नये, परंतु अशा परिस्थितीतही जेव्हा सर्वशक्तिमान ईश्वराच्या सन्मानाचा प्रश्न आला तेव्हा त्यांना शांत राहणे सहन झाले नाही आणि शत्रूला माहीत असो वा नसो, त्यांने आपल्यावर हल्ला करून मारले तरी आपण यापुढे गप्प बसणार नाही. तेव्हा ते साथीदारांना म्हणाले, तुम्ही गप्प का आहात?

एके ठिकाणी हजरत मुस्लेह माऊद (र.ज.) यांनी सांगितले की मक्केतील ज्या मोठ-मोठे सरदार पैगंबर मुहम्मद (स.) यांना हत्या करण्याचे प्रयत्न करत होते, त्या लोकांचे आज जगात काही नाव आहे का? तुम्ही पहाल की मुहम्मद रसूलल्लाह सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्या नावार लाखो आवाज उठतील आणि संपूर्ण जग म्हणेल, हो! पवित्र मुहम्मद (स.) आमच्यामध्ये उपस्थित आहेत कारण त्यांचे प्रतिनिधित्व करण्याचा मान आम्हाला प्राप्त आहे, परंतु अबू जहल जेव्हा तुम्ही नाव घ्याल, तुम्हाला कोणत्याही कोपऱ्यातून आवाज ऐकू येणार नाही.

मग, हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) सांगतात की पैगंबरांवर आलेल्या संकटांमध्येही अल्लाहचे हजारो रहस्ये आहेत. पवित्र प्रेषित (स.) यांना खूप त्रास दिले गेले. एक कथन असे आहे की, उहूदच्या युद्धात सत्तर तलवारींनी त्यांच्यावर हल्ला करण्यात आले आणि मुसलमानांचे दुर्बळ परिस्थिती पाहून काफिरांना खूप आनंद झाला. अशी बिकट परिस्थितीला सामोरे जाणे देखील आवश्यक असते, मक्का सोडताना पैगंबर (स.) यांना कोणकोणते दुःख सहन करावे लागले; परंतु पहा आता अल्लाहने परिस्थिती बदलली आहे.

हजरत हन्झालाह यांच्या हौतात्म्याची घटना वर्णिले जाते की, त्यांची पत्नी सांगते की जेव्हा माझ्या पतीने ऐकले की पवित्र पैगंबर (स.) युद्धासाठी निघाले आहेत तेव्हा माझे अपवित्र स्थितीत होते आणि स्नान करणे त्यांच्यावर अनिवार्य होते परंतु पवित्र पैगंबर (स.) निघण्याची बातमी ऐकून ते इतक्या लवकर आणि आतुरतेने घरातून निघाले की त्याना स्नान करणे देखील आवश्यक वाटले नाही आणि ते तलवार घेऊन रणांगणात शिरले. शद्दाद बिन अस्वदने त्याना शहीद केले. पवित्र पैगंबर(स.) म्हणाले, ''मी स्वर्ग आणि पृथ्वीच्या मधोमध असलेल्या देवदूतांना चांदीच्या भांड्यांमध्ये स्वच्छ पाणी आणले आणि हंझाला आंघोळ घालत होते.''

हजरत मुस्लेह माऊद म्हणाले की, पवित्र पैगंबर (स.) हे आता युद्ध भूमीत शहीद झालेल्या लोकांचे मृतदेह संरक्षित करण्यास उतरले. जो दृश्य मुसलमानांसमोर आला तो रक्तशोषक होता. सत्तर मुस्लीम धूळ आणि रक्ताने माखलेले जमिनीवर पडून अरबांच्या रानटी कर्मकांडाचे भीषण दृश्य मांडत होते. या शहीह झालेल्या मुसलमानांमध्ये केवळ ६ मुहाजिर आणि बाकी सारे अन्सार होते. याउलट कुरैश च्या मृतकांची संख्या २३ होती. जेव्हा पवित्र प्रेषित (स.) त्यांचे काका आणि पाळक भाऊ

हमजा बिन अब्दुल मुत्तलिब (र.ज) यांच्या मृतदेहाजवळ पोहोचले तेव्हा ते स्तब्ध झाले, कारण क्रूरस्वभावी हिन्दा पत्नी अबू सुफयानने, त्यांच्या प्रेताचे विकृत रूप केले होते. थोडावेळ ते शांतपणे उभा राहिले आणि त्यांच्या चेहऱ्यावर दुःख आणि संतापाच्या खुणा दिसत होत्या. क्षणभर पवित्र प्रेषितांचा स्वभावही या गोष्टीकडे झुकलेला होता की जोपर्यंत या मक्केतील जंगली श्वापदांशी वागणूक दिली जात नाही तोपर्यंत त्यांना कदाचित चैतन्य येणार नाही, पण पवित्र प्रेषित हा विचार करून थांबले आणि धीर धरल किंबहुना पवित्र प्रेषित (स.) यांनी यानंतर इस्लाममध्ये मृतदेहाची अवहेलना करण्याची प्रथा कायमची निषिद्ध केली आणि म्हटले,''शत्रूने काहीही केले तरी, तुम्ही अशा प्रकारच्या रानटी पद्धतीपासून दूर राहून चांगुलपणा आणि दयाळूपणाची पद्धत स्वीकारली पाहिजे.''

पवित्र प्रेषित (स.) यांचे चुलत भाऊ अब्दुल्लाह बिन जहश यांच्या मृतदेहाचीही विटंबना करण्यात आली होती. जसजसे पवित्र प्रेषित (स.) एका प्रेतातून दुसऱ्या प्रेताकडे जात होते, तसतसे त्यांच्या चेहऱ्यावरील शोक आणि वेदनांच्या खुणा वाढत होत्या.

या शहीदांचा आणि त्यांच्या बलिदानाचा उल्लेख करताना हजरत मुस्लेह माऊद यांनी साद बिन रबी यांचे पवित्र प्रेषित (स.) यांच्यावरील प्रेम आणि आपुलकीबद्दल पुढीलप्रमाणे सांगितलेः पहा अशावेळी जेव्हा लोकांना वाटते की मी मरत आहे तेव्हा त्याच्या मनात काय विचार येतात. माझ्या बायकोचे काय होईल याचा विचार करतो. माझ्या मुलांना कोण विचारणार? पण या सोबत्याने असा कोणताही संदेश दिला नाही. त्याने एवढेच सांगितले की, आम्ही पैगंबरांचे रक्षण करत हे जग सोडतो. तुम्ही सुद्धा त्याच मार्गाने आमचे अनुसरण करा. या लोकांमधील विश्वासाची शक्ती होती ज्याच्या सहाय्याने त्यांनी जगात क्रांती आणली आणि सीझर आणि किसराच्या राज्यांची सिंहासने उलथवून टाकली. हजरत मुस्लेह माऊद सांगतातः मरणाऱ्या व्यक्तीला आखेरच्या काहीं मिनिटांसाठी पत्नी आणि मुले भावा-बहिणींना मिळण्याची इच्छा असते. आणि जर काही झाले, मी त्यांच्यासाठी मृत्युपत्र करावे, परंतु ते साथीदार खडकाळ जमिनीवर पडलेले होते, परंतु अशा अवस्थेतही त्यांनी संदेश दिला की मुहम्मद, (स.) हे ईश्वराचे अनमोल अनामत आहे. मी स्वतःचा त्याग करून याचे रक्षण केले आणि आता माझ्या प्रिय बंधू आणि मुलांसाठी माझी शेवटची इच्छा आहे की त्यांनीही या अनामतचे प्राण देऊन रक्षण करावे आणि असे म्हणत मरण पावले.

हुजूर अनवर म्हणालेः पवित्र पैगंबर (स.) साठी जी प्रेमभावना होती ती पाहून लोक स्तब्ध होतात. अल्लाह आपल्यामध्येही पवित्र पैगंबर (स.) साठी प्रेमाची ही भावना निर्माण करो आणि जेव्हा हा विचार निर्माण होईल, तेव्हा आपण सर्वशक्तिमान अल्लाहशी आपले नाते वाढवू आणि आपल्या कमकुवतपणा दूर करण्याचा प्रयत्न करू जेणेकरून आपण खऱ्या अर्थात आमच्या उपासनेत खरा इस्लामी रंग, आमचे नैतिकता आणि सवयी प्रदर्शित करू शकू. अल्लाह आम्हाला याचे सामर्थ्य प्रदान करो.

प्रवचनाच्या दुसऱ्या भागात हुजूर अनवर यांनी काही मृतांचा उल्लेख केला.

प्रथम यमनचे डॉ.मंसूर शाबुती साहिब यांच्या मृत्यूला हौतात्म्य असे घोषित करून ते म्हणाले की ते अहमदी असल्यामुळे पकडले गेले आणि ते कैदेतच मरण पावले, त्यामुळे त्यांना शहीद म्हणता येईल. आणि या अर्थाने हे यमनचे पहिले अहमदी शहीद आहेत. मृतक यमनमधील प्रसिद्ध डॉक्टर होते. त्यानंतर अहमदिया जमाअतचे अमीर मुहम्मद शरीफ औदा साहिब यांचे वडील मा. सलाहुद्दीन

मुहम्मद सालेह अब्दुल कादिर औदा साहिब यांचा उल्लेख करण्यात आला. खिलफातसाठी त्यांचे प्रेम अपार होते आणि जमाअतच्या व्यवस्थेचा खूप आदर होता. तिसरा उल्लेक रेहाना फरहत साहेबा पत्नी करामतुल्लाह खादिम साहेब रब्वाह यांचा आहे. हुजूर अन्वर यांनी नमाज नंतर त्यांची नमाज ए जनाजा अदा करण्याची घोषणा केली.

اَلْحَمْدُ لِلّٰہِ! اَلْحَمْدُ لِلّٰہِ نَحْمَدُہٗ وَنَسْتَعِیْنُہٗ وَنَسْتَغْفِرُہٗ وَنُؤْمِنُ بِہٖ وَنَتَوَکَّلُ عَلَیْہِ وَنَعُوْذُ بِاللّٰہِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَیِّئَاتِ اَعْمَالِنَا مَنْ
یَّھْدِہِ اللّٰہُ فَلَا مُضِلَّ لَہٗ وَمَنْ یُّضْلِلْہُ فَلَا ھَادِیَ لَہٗ وَنَشْھَدُ اَنْ لَّا اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ وَنَشْھَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُہٗ وَرَسُوْلُہٗ، عِبَادَ اللّٰہِ رَحِمَکُمُ اللّٰہُ اِنَّ
اللّٰہَ یَاْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِیْتَآءِ ذِی الْقُرْبٰی وَیَنْھٰی عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْکَرِ وَالْبَغْیِ یَعِظُکُمْ لَعَلَّکُمْ تَذَکَّرُوْنَ اُذْکُرُوا اللّٰہَ یَذْکُرْکُمْ
وَادْعُوْہُ یَسْتَجِبْ لَکُمْ وَلَذِکْرُ اللّٰہِ اَکْبَرُ۔